| MHJN020013622025 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२४६/२०२५<br>आनंदसिंग वि. निरंक |
| --- | --- |

## निशाणी क्र.०१ वरील आदेश

अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम ३ व ७ नुसार वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जदारा यांचे वडील नामे बसंतसिंग गुलाबसिंग सुर्यवंशी हे दिनांक ०४.०४.२०२१ रोजी आणि आई नामे कुसुमबाई सुर्यवंशी या दिनांक ११.०३.२०२५ रोजी मयत झाल्या आहे. अर्जदार हेच मयत बसंतसिंग गुलाबसिंग सुर्यवंशी यांचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला अर्जदार यांना शासकिय व निमशासकीय कामकाजाकरिता आवश्यक असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. या अर्जाच्या कामी नोटीस काढण्यात आली. सदरची नोटीस स्थानिक वृत्तपत्र पुण्यनगरी मध्ये दिनांक ०६.०८.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली. ती निशाणी क्र.१२ वर दाखल आहे. दिनांक ०६.०८.२०२५ पासून आजपर्यंत या अर्जाला कोणीही हरकत नोंदवली नाही.

०४. सदर अर्जाच्या पृष्ठयर्थ अर्जदार यांनी मयत कुसुमबाई सुर्यवंशी आणि बसंतसिंग गुलाबसिंग सुर्यवंशी यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मुळप्रत निशाणी क्र.१०, २० आणि स्वत:च्या आधारकार्डची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. अर्जदारातर्फे पुरावा संपल्याची पुरशीस निशाणी क्र.२२ वर दाखल केली आहे.

०५. अर्जदार व सुदेश भिकाजी भिंगारे यांनी अर्जाच्या पृष्ठयर्थ निशाणी क्र.१३ व २१ वर त्यांचा पुरावा नोंदविलेला आहे. मयत बसंतसिंग गुलाबसिंग सुर्यवंशी यांचे अर्जदार हे प्रत्यक्ष कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे.

०६. येथे हे नमूद करणे गरजेचे आहे की, १८२७ चे मुंबई नियमन या

अधिनियमाचा हेतू हा कायदेशीर वारसांची औपचारिक मान्यता देण्यापुरता मर्यादीत आहे. त्यामुळे सदर अर्जासंदर्भात न्यायालयीन चौकशीची व्याप्ती केवळ अर्जदाराच्या वारस असल्याच्या दाव्याची खात्री करण्यापर्यंतच मर्यादीत असते. वारस दाखल्यामुळे अर्जदार वारसास मालमत्ते संदर्भात कोणतेही मालकी हक्क प्राप्त होत नाहीत किंवा इतर वारसांच्या तत्संबंधी अधिकारास बाधा पोहोचत नाही. सदर दाखला प्राप्त वारस व्यक्तीला त्या वेळेपुरती त्याच्या सदर मालमत्ता व्यवस्थापनाच्या अधिकारास मान्यता दिली जाते.

०७. अभिलेखावर दाखल कागदपत्रे व पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार हेच मयत बसंतसिंग गुलाबसिंग सुर्यवंशी यांचे कायदेशीर वारस आहे व अर्जदारांचे व्यतिरीक्त त्यांना इतर कोणीही कायदेशीर वारस आहे असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. अर्जदार यांनी दिलेला पुरावा हा अटळ व अबाधीत राहीला व सदर पुराव्यावर अविश्वास दर्शवावा असे कोणतेही कारण दिसून येत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर बॉम्बे रेग्युलेशन, १८२७ मधील परिशिष्ट (अपेन्डीक्स)–ब प्रमाणे अर्जदार हे मयत बसंतसिंग गुलाबसिंग सुर्यवंशी यांचे औपचारिक कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUPRIYA NILESH PUND
Date: 2026.03.18 11:10:57 +0530

जालना
दिनांकः १७.०३.२०२६.

**(श्रीमती एस. एन. पुंड)**
**३ रे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, जालना.**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :- | यु. आर. दसरे |
| न्यायालयाचे नांव | :- | ३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, क.स्तर, जालना. |
| पी.डी.एफ. व दिनांक | :- | १८.०३.२०२६. |

स्वाक्षरित/-

लघुलेखकाची सही